अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार नवीन औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक संस्थांना या खाजगी संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून सुरु करण्यासाठी मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.टीईएम-२००६/(३२२/०६)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० जून , २००६

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.०६/०७/एमएस/फार्मसी/२००६/००२, दि.१४ जून ,२००६ चे पत्र.
२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.०६/०७/एमएस/फार्मसी/२००६/००४, दि.१४ जून ,२००६ चे पत्र.

**शासन निर्णय :** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये खालील नमूद केलेल्या संस्थेच्या नाव समोर दर्शविल्याप्रमाणे बी.फार्मसी हा पदवी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून ६० प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यासाठी मान्यता दिली आहे. परिषदेची सदर मान्यता विचारात घेऊन सदर संस्थेस शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून बी.फार्मसी हा पदवी अभ्यासक्रम कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यासाठी या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे यांचे जयवंतराव सावंत कॉलेज ऑफ फार्मसी ॲण्ड रिसर्च, सर्वे नं.५८, इंद्रायणी नगर, हडपसर, पुणे ४११ ०२८ | बी.फार्मसी | ६० |
| २. | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे यांचे चरक कॉलेज ऑफ फार्मसी ॲण्ड रिसर्च, गट नं.७२०/१ आणि २ , वाघोली, ता.हवेली पुणे ४१९ २०७ | बी.फार्मसी | ६० |

२. सदर मान्यता खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे :-

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहीत केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहीत केलेल्या सर्व अटी व शर्ती (शिक्षण शुल्क व प्रवेश प्रक्रियेसह ) मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधीत संस्थेने संबंधीत विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

४) संबंधीत संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी जे प्रवेश नियम लागू करण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

६) प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क समितीकडून जे शिक्षण लागू करण्यात येईल तेच शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावे.

७) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाने / संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी अॅक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहीत मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

३. याबाबत आवश्यक त्या औपचारिक बाबींची पूर्तता करण्यासाठी संबंधीत संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांच्याशी त्वरीत संपर्क साधावा. संचालक, तंत्रशिक्षण यांनी याबाबत आवश्यक त्या नोंदी अभ्यासक्रम विषयक नोंदवहीत ठेवाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( स्मिता द. निवतकर )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई
मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
संबंधित संस्थेस
निवड नस्ती

प्रत-

१) सल्लागार (यू.जी.) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११० ००२.

२) विभागीय अधिकारी, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०